सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ९७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २३ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## होर्मुझ मार्ग खुला करण्यावर इराण सकारात्मक, अमेरिकेला नवा प्रस्ताव; युद्ध थांबण्याची चिन्हे?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नवी दिल्ली**

अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष शमताना दिसत नाही. उलट दोन्ही देशातील तणाव वाढताना पाहायला मिळत आहे. अमेरिका आणि इराण युद्धामुळे जगावरील तेल संकट वाढत आहे. अमेरिके सोबतचे युद्ध संपवण्या साठी इराणने मध्यस्थां समोर एक नवीन प्रस्ताव सादर केला आहे. वृत्तांनुसार, ट्रम्प प्रशासन इराणविरुद्ध पुन्हा लष्करी कारवाई करण्याची तयारी करत आहे. एका वरिष्ठ इराणी अधिकाऱ्याच्या हवाल्याने वृत्त देण्यात आले आहे की, तणाव संपवण्यासाठी इराणने एक नवीन प्रस्ताव दिला आहे.हा नवा प्रस्ताव अशा वेळी आला आहे, अमेरिकेकडून इराणवर सातत्याने दबाव आणला जात असून, तीव्र हल्ल्याचा इशारा देण्यात आलेला आहे. नाव न सांगण्याच्या अटीवर एका अधिकाऱ्याने सांगितले की, सर्वप्रथम युद्ध कायमस्वरूपी संपवण्यासाठी इराणला करार हवा आहे. त्यानंतर अणुकार्यक्रमावरील करारावर वाटाघाटी सुरू करण्यात येतील. ट्रम्प युद्ध



संपवण्याबाबत गंभीर आहेत, हे मध्यस्थांना माहीत आहे. परंतु, ट्रम्प यांनी इराणसोबतचे युद्ध संपवण्याबाबत संमिश्र संकेत दिले आहेत, असेही अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

एका अधिकाऱ्याने सांगितले की, इराणने कराराच्या मसुद्यात काही अटी ठेवल्या आहेत. या अटींमध्ये होर्मुझची सामुद्रधुनी तात्पुरती पुन्हा उघडण्याचा समावेश आहे. परंतु ही बाब अमेरिकेने सर्वप्रथम इराणच्या अटी पूर्ण करण्यावर अवलंबून असेल. या अटींमध्ये काही बाबींचा समावेश करण्यात आला आहे. अमेरिकेने इराणी बंदरांवरील नाकेबंदी उठवणे. जप्त केलेली अब्जावधी डॉलर्स किमतीची इराणी मालमत्ता परत करणे. इराणच्या युद्धातील नुकसानीची भरपाई देणे, अशा गोष्टी समाविष्ट आहेत.दरम्यान, इराणच्या अधिकाऱ्याने इशारा दिला आहे की, जर अमेरिका आणि इस्रायलने पुन्हा हल्ले सुरू केले, तर इराण प्रत्युत्तर देण्याची तयारी आधीच करत आहे. चर्चा केवळ अणुविषयापुरतीच मर्यादित असावी, हा अमेरिकेचा आग्रह हा वाटाघाटींमधील सर्वांत मोठा अडथळा आहे.

## शिवसेना फुटल्याचे खापर माझ्यावर फोडू नका

### बच्चू कडू यांचा उद्धव ठाकरेंवर पलटवार

### कॅबिनेट मंत्रीपदावर फसवणूक केल्याचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३मुंबई-** सत्ताधारी शिवसेनेचे विधान परिषदेचे सदस्य बच्चू कडू यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंवर जोरदार पलटवार केला आहे. उद्धव ठाकरे यांनी मला कॅबिनेट मंत्रिपदाचा शब्द दिला होता. पण प्रत्यक्षात माझ्याऐवजी शंकरराव गडाख यांना त्यांनी कॅबिनेट मंत्री केले. मला केवळ राज्यमंत्रीपदावर समाधान मानावे लागेल, असे ते अप्रत्यक्षपणे ठाकरेंवर फसवणुकीचा आरोप करताना म्हणालेत.बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेतील सोलापूर, परभणी व धाराशिव जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी शुक्रवारी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी त्यांचे स्वागत करताना उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटाच्या तिकिटावर विधान परिषदेवर जाणाऱ्या बच्चू कडू यांच्यावर निशाणा साधला. बच्चू कडूला घरी बोलावन मंत्री केले ही माझी चूक झाली. तो जुना शिवसैनिकच होता. पण लोभापायी गेला त्याला जाऊ द्या. कार्यकर्ते माझ्यासोबत आहेत याचा मला आनंद आहे, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या टीकेला बच्चू कडू यांनी शुक्रवारी प्रत्युत्तर दिले.बच्चू कडू म्हणाले, उद्धव ठाकरे यांनी आपल्याला कॅबिनेट मंत्रिपदाचा शब्द दिला होता. पण प्रत्यक्षात मला राज्यमंत्रीपद दिले.



माझ्याऐवजी शंकरराव गडाख यांना त्यांनी कॅबिनेट मंत्रिपद दिले. एकनाथ शिंदेंनीच माझी उद्धव ठाकरे यांच्यासोबत भेट घालून दिली होती. मी उद्धव ठाकरे यांच्या घरी जाऊन त्यांना पाठिंबा दिला होता. आमच्या मतांमुळेच ते मुख्यमंत्री झाले. त्यांना स्वतः मुख्यमंत्री व्हायचे होते. त्यामुळे त्यांनी आम्हाला संख्याबळासाठी गळ घातली होती. ठाकरेंनी आम्हाला दिव्यांग मंत्रालय दिले नाही. त्यांनी माझ्याऐवजी गडाखांना ते दिले.उद्धव ठाकरे माझ्याविषयी जे काही बोलले ते मनापासून बोलले असे वाटत नाही. आम्ही तुम्हाला मुख्यमंत्री केले. मग आम्ही चूक केली असे म्हणणार का? मी गुवाहाटीला जातानाही उद्धव ठाकरे यांना विचारले होते. त्यामुळे त्यांनी शिवसेना फुटीचे खापर माझ्या डोक्यावर फोडू नये, असे बच्चू कडू म्हणाले.

## ग्रामीण भागात इंधन मिळेना, अचानक ३० टक्के मागणी वाढली,

### CM फडणवीस म्हणाले, काहीतरी गडबड...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अहिल्यानगर**

इंधन पुरवठ्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी बोलणे झालेले आहे. शेतकऱ्यांना डिझेल योग्य प्रमाणात उपलब्ध करून देण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. पेट्रोल आणि डिझेलच्या मागणीत अचानक २० ते ३० टक्क्यांची वाढ झालेली आहे. कोणी साठेबाजी करत असेल, तर त्यावरही लक्ष ठेवण्याचे निर्देश दिलेले आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. ते ग्रामीण भागात इंधन मिळत नाही, याबाबत पत्रकारांनी देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारला. यावर बोलताना ते म्हणाले की, यासंदर्भात सर्व जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना सूचना केलेल्या आहेत. शेतकऱ्यांना जे डिझेल लागेल, ते उपलब्ध करून द्या. परंतु, शेतकऱ्यांच्या नावाखाली कोणी साठेबाजी करत असेल, तर त्यावरही लक्ष ठेवा.

कारण काही भागात अचानक २० ते ३० टक्क्यांनी पेट्रोल आणि डिझेलची मागणी वाढल्याचे दिसत आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

दरवर्षी आपल्याला किती इंधन लागते, हे आपल्याला




माहिती आहे. त्यात जर अचानक २० ते ३० टक्के वाढ होत असेल, तर त्यात काहीतरी गडबड असण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांना त्रास होऊ नये. अशा दृष्टीने काही उपाययोजना करण्यास सांगितलेल्या आहेत. काही ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांनी आरसी बुक बघून त्यांना डिझेल देणे सुरू केले आहे. मला असे वाटते की, आपण ते करण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

दरम्यान, देशात पुन्हा एकदा शनिवारी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ झाली. पेट्रोल प्रति लिटर ८७ पैसे, तर डिझेल प्रति लिटर ९१ पैशांनी महागले. गेल्या दहा दिवसात तिसऱ्यांदा ही दरवाढ झाली आहे. यापूर्वी १५ मे रोजी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रत्येकी ३ रुपयांची वाढ झाली होती. त्यानंतर १९ मे रोजी पेट्रोल दरात ८७ पैशांनी आणि डिझेल दरात ९१ पैशांची वाढ झाली होती.

## १५ जूननंतरही तापमान वाढते राहिल्यास शाळांच्या वेळापत्रकात मोठ्या बदलाची शक्यता !

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३ नागपूर-** विदर्भासह संपूर्ण राज्यात सध्या उष्णतेचा पारा मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. ही वाढती दाहकता आणि उष्णतेची लाट अशीच कायम राहिल्यास विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी शाळा सुरू करण्याची तारीख पुढे ढकलण्याचा विचार शासन करत आहे, अशी महत्त्वाची माहिती गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी नागपुरात दिली. १५ जूननंतरच्या परिस्थितीचा आढावा घेऊन यासंदर्भात तातडीने योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

वाढत्या तापमानाची दखल घेत नागपूर विद्यापीठातील सर्व परीक्षा आता दुपारऐवजी सकाळच्या सत्रात घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, तसेच परीक्षा केंद्रांची संख्याही वाढवण्यात येणार आहे. यासोबतच, पूर्व प्राथमिक शाळांच्या नोंदणीसाठी नवीन कायदा आणण्याची शासनाची तयारी अंतिम टप्प्यात असून, याचा मसुदा मंजुरीसाठी न्याय विभागाकडे पाठवण्यात आला आहे. आगामी अधिवेशनात हा कायदा



आणण्याचा सरकारचा प्रयत्न राहील, असे भोयर यांनी सांगितले.वाढत्या तापमानाची दखल घेत नागपूर विद्यापीठातील सर्व परीक्षा आता दुपारऐवजी सकाळच्या सत्रात घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, तसेच परीक्षा केंद्रांची संख्याही वाढवण्यात येणार आहे. यासोबतच, पूर्व प्राथमिक शाळांच्या नोंदणीसाठी नवीन कायदा आणण्याची शासनाची तयारी अंतिम टप्प्यात असून, याचा मसुदा मंजुरीसाठी न्याय विभागाकडे पाठवण्यात आला आहे. आगामी अधिवेशनात हा कायदा आणण्याचा सरकारचा प्रयत्न राहील,असे भोयर यांनी सांगितले.


## राज्याच्या वन विभागात अंशतः बदलाचा गोंडस डाव

### आरएफओंच्या बदल्यांमध्ये मोठ्या आर्थिक व्यवहार?

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२३अमरावती**

राज्याच्या महसूल व वन विभागाने २१ वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या (आरएफओ) अंशतः बदल पदस्थापनेचे आदेश जारी केले आहेत. वरकरणी हा प्रशासकीय बदल वाटत असला, तरी या बदल्यांमागे मोठा ''आर्थिक गेम'' आणि राजकीय दबावतंत्र असल्याची जोरदार चर्चा वन वर्तुळात सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, नियम डावलून अनेक अधिकाऱ्यांची ''प्रादेशिक टू प्रादेशिक'' वन विभागात पदस्थापना करण्यात आल्यामुळे या बदल्या संशयाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत.

वन विभागाच्या नियमांनुसार ''प्रादेशिक टू प्रादेशिक'' अशा थेट बदल्या करणे मुळात नियमाविरोधी मानले जाते. मात्र, महसूल व वन विभागाच्या उपसचिव निकेता पांडे यांच्या स्वाक्षरीने २१ मे २०२६ रोजी निघालेल्या या आदेशांमुळे नियमांना बगल दिल्याचे स्पष्ट होत आहे. राजकीय नेत्यांच्या मर्जीतील अधिकाऱ्यांना मोक्याच्या जागा देण्यासाठी प्रशासनाने राजकीय दबावापुढे गुडघे टेकल्याचा आरोप




आता उघडपणे केला जात आहे. या संपूर्ण प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर ''लक्ष्मीदर्शन'' झाल्याचीही कुजबूज सुरू आहे. १३ मे २०२६ रोजी आरएफओंच्या नियमित बदल्यांचे आदेश निघाले असताना ८ दिवसांनी अंशतः पदस्थापना करण्यात आल्यामुळे याला वेगळे वळण मिळाले आहे.

२१ मे रोजी जारी झालेल्या आदेशानुसार वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या नवीन पदस्थापना करण्यात आल्या आहेत. यात प्रमोद वाडे (मुख्य वनसंरक्षक, नागपूर प्रादेशिक), स्वाती लांडे (बल्लारशाह), ऋषिकेश वाघमारे (डहाणू दहिसर प्रादेशिक), लक्ष्मण चिखले (अलिबाग), विकास भामरे (पुणे), आशा ससाणे (माळशिरस), शीतल कंठाळे (पुणे) मारोती मुळे (पुणे), आदिनाथ घनवट (अहिल्यानगर), शंकर पालेपवाड (सुरगणा, नाशिक), महेश पाटील (धुळे), प्रज्ञा वडमारे (जालना), निलेश रोडे (तोरणमाळ नंदूरबार) विजय वारे (उत्तर आर्णी, यवतमाळ), राजेंद्र कातखेडे (हिवरी, यवतमाळ), त्रृदेश रोडगे (शेंबाळ पिंपरी, पुसद), विजय दौड (जालना दक्षिण), भालचंद्र तळेकर ( परांडा, धाराशिव), किशोर आहेर (मालवण, सिंधुदुर्ग), संदीप कुंभार (सांगली), कैलास भंबुर (पातूर, अकोला) यांचा समावेश आहे.

## देशाला अनुपम भेट; CM फडणवीसांचा वंदे भारत ट्रेनने प्रवास, अनुभव सांगताना तोंडभरून कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक दि,२३शिर्डी**

सेवा हेच ब्रिद, सेवा हाच धर्म. देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या संसाधनांच्या जबाबदार वापराच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई ते शिर्डी हा प्रवास वंदे भारत एक्स्प्रेसने केला. सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य देत प्रवासादरम्यान त्यांनी शासकीय कामकाजही पार पाडले. शिर्डीला पोहोचताच पत्रकारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वंदे भारत ट्रेन प्रवासाचा अनुभव विचारला. यावर बोलताना ते म्हणाले की, ही नवभारताची अनुपम भेट पंतप्रधान मोदी यांनी आपल्याला दिलेली आहे. जगातील विकसित राष्ट्रांमध्ये जशा ट्रेन आहेत, तशा प्रकारची ही वंदे भारत ट्रेन आहे. याच ट्रेनने मुंबईहून साईनगर शिर्डीला आलो. अतिशय उत्तम प्रवास झाला. खूप चांगला अनुभव होता, असे कौतुकोद्गार देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

अनेक लोकांशी भेटी झाल्या. प्रवासात फाइल्सचे कामही करता आले. त्यामुळे हा प्रवास मला अत्यंत



लाभदायी वाटला. जेवढे अनुकरण करता येईल, तेवढे करावे. माझाही हा प्रयत्न आहे की, जिथे-जिथे शक्य आहे, त्या-त्या ठिकाणी आपण पंतप्रधान मोदी केलेल्या आवाहनाला अनुरूप काम करावे. आपण केले, तर लोकांनाही तसे काम करण्याची इच्छा तयार होते. तोच माझा प्रयत्न आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी आवर्जून सांगितले.

दरम्यान, भक्तीचे केंद्र असलेले शिर्डी आता शक्तीचे केंद्र बनत आहे, यावर देवेंद्र फडणवीस यांना प्रतिक्रिया विचारण्यात आली.

## साईंच्या शिर्डीत श्रद्धेसोबत शक्तीचा नवा अध्याय

### अख्ख्या देशातील सर्वात मोठा तोफगोळा प्रकल्प

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ शिर्डी-** देशाच्या संरक्षण क्षेत्रात महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्याची मोठी आणि ऐतिहासिक नोंद होण्याची तयारी सुरू झाली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे तीर्थक्षेत्र असून दररोज देश विदेशातून भाविक शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी हजेरी लावत असतात. शिर्डीत श्रद्धेसोबत आता शक्तीचाही नवा अध्याय सुरू होत आहे.

राजनाथ सिंग यांच्या हस्ते उद्घाटन

जिल्ह्यात संरक्षण उत्पादन क्षेत्राला मोठी चालना मिळत असून, शिर्डी येथील सावळीविहीर औद्योगिक वसाहतीत उभारलेल्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचं उद्घाटन आज २३ मे रोजी सायंकाळी देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी




खासदार सुजय विखे यांच्या प्रयत्नातून सुरू होत असलेल्या या प्रकल्पामुळे परिसरातील अनेक तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

**१५५ मि.मी. क्षमतेचे ५ लाख तोफगोळे-**

खासगी क्षेत्रातील हा देशातील सर्वात मोठा तोफगोळा निर्मिती कारखाना आहे. येथे प्रतिवर्षी १५५ मि.मी. क्षमतेचे ५ लाख तोफगोळे तयार होणार आहेत. संपूर्ण उत्पादन तंत्रज्ञान आणि कच्चा माल पूर्णपणे स्वदेशी असून, हा प्रकल्प अवघ्या एका वर्षात उभारण्यात आला आहे. शिर्डीतील प्रकल्पासाठी १ हजार कोटींची गुंतवणूक प्रस्तावित असून ६०० कोटी पूर्ण असून, यामुळे सुमारे २ हजार जणांना रोजगार मिळेल. सर्व प्रकल्प पूर्ण झाल्यावर ही रोजगार संख्या ४ ते ५ हजारांवर जाईल. २०० एकर क्षेत्रावर रॉकेट लाँचर, ड्रोन आणि इलेक्ट्रॉनिक्स यंत्रणांच्या चाचणी सुविधा विकसित केल्या जात आहेत. तसेच, याच दिवशी १५ टन क्षमतेच्या बायो-सीएनजी प्रकल्पाचंही उद्घाटन होईल.या उद्घाटनानिमित्त २३ व २४ मे रोजी भव्य संरक्षण प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. ज्यात १०० हून अधिक चडचए कंपन्या सहभागी होणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक इन इंडिया' संकल्पनेला बळ देणारा हा प्रकल्प अहिल्यानगर जिल्ह्याला देशातील एक प्रमुख 'संरक्षण उत्पादन केंद्र' म्हणून नवी ओळख मिळवून देणार आहे.

## संपादकीय ......

# साखर सुरक्षा

*यंदा साखरेच्या निर्यातीवर ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत घातलेली बंदी ही देशांतर्गत बाजारपेठेतील साखरेचे दर व साठा नियंत्रणात ठेवणे आणि अन्नधान्य महागाईला लगाम घालणे या उद्देशाने उचललेले पाऊल आहे. हा निर्णय घेताना साखर निर्यातीचा दर्जा 'प्रतिबंधित' श्रेणीतून 'निषिद्ध' श्रेणीत टाकला आहे. जागतिक बाजारपेठेतील भारताची पत, शेतकर्यांची देणी, कारखान्यांची आर्थिक स्थिती आणि इथेनॉल उद्दिष्ट अशा अनेक पातळ्यांवर या धोरणाचे पडसाद उमटणार आहेत. नव्या धोरणानुसार कच्च्या, पांढर्या आणि शुद्ध अशा तिन्ही प्रकारच्या साखरेवर निर्यातबंदी आहे. अमेरिकेला आणि युरोपीय संघाला आधीच दिलेला निश्चित कोटा, तसेच अन्न सुरक्षेच्या कारणास्तव इतर देशांच्या सरकारांनी केलेल्या विनंतीनुसार होणारी निर्यात यातून वगळली आहे. या निर्यातबंदीमागील मुख्य कारण म्हणजे, देशांतर्गत साखरेचा घटणारा साठा. चालू २०२५-२६ साखर हंगामात देशात २८३ लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज आहे.*

*मागील हंगामाच्या २५४ लाख टनांपेक्षा ११ टक्क्यांनी अधिक असला, तरी सरकारच्या सुरुवातीच्या अंदाजापेक्षा तो ४ टक्क्यांनी कमी आहे. ऑक्टोबर २०२५ मध्ये महाराष्ट्र आणि कर्नाटकातील अवकाळी पावसामुळे उसाला अकाली तुरे आल्याने साखरेचे प्रमाण घटले. यामुळे देशातील साखरेचा अंतिम शिल्लक साठा ४० ते ४२ लाख टन राहण्याचा अंदाज असून गेल्या नऊ वर्षांतील ही नीचांकी पातळी आहे. साखरसाठा केवळ दीड महिन्यासाठी पुरेसा ठरणार आहे. ऑगस्ट ते नोव्हेंबरदरम्यान सणासुदीच्या काळात साखरेची मागणी वाढते. अशावेळी बाजारपेठेत कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये आणि किमती आटोक्यात राहाव्यात, यासाठी निर्यात रोखली आहे. देशात घरगुती वापराव्यतिरिक्त मिठाई, शीतपेये, बेकरी, औषधनिर्मिती आणि अन्न प्रक्रिया उद्योगांमध्ये साखरेची मागणी अवाढव्य आहे.*

*भारतात दरवर्षी सुमारे २८ ते २९ दशलक्ष टन साखरेची गरज भासते. उत्पादन घटले आणि परकीय चलनाच्या मोहापायी निर्यात सुरूच राहिली, तर देशात साखरेचा तीव- तुटवडा निर्माण होऊ शकतो. निर्यातबंदीमुळे जागतिक स्तरावर साखरेची पुरवठा साखळी विस्कळीत होईल. कारण, ब्राझीलनंतर भारत हा सर्वाधिक साखर निर्यात करणारा दुसर्या क्रमांकाचा देश आहे. यूएई, अफगाणिस्तान, श्रीलंका आणि बांगला देश या देशांबरोबरच सुदान, लिबिया या आफ्रिका खंडातील अनेक देश भारतीय साखरेवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. निर्यातबंदीनंतर न्यूयॉर्क आणि लंडनच्या साखरेच्या वायदे बाजारात मोठी तेजी आली. आता जगभरातील आयातदार देशांचा संपूर्ण भार ब्राझीलवर पडणार आहे; परंतु एकाच देशाकडून जगाची साखरेची संपूर्ण गरज तातडीने भागवणे शक्य होत नाही. वास्तविक, आंतरराष्ट्रीय बाजारात विश्वासार्ह पुरवठादार म्हणून भारताने कमावलेली पत अशा तडकाफडकी निर्णयांमुळे धोक्यात येऊ शकते; पण देशांतर्गत स्थितीचा विचार करता ही जोखीम पत्करणे क्रमप्राप्त होते.*

*भारतात ५ कोटींहून अधिक शेतकरी उस शेतीवर अवलंबून असल्याने या क्षेत्राला आर्थिक, राजकीय आणि सामाजिक महत्त्व आहे. सरकार दरवर्षी उस दरात वाढ करते; परंतु साखरेच्या 'किमान विक्री दरात' त्या प्रमाणात वाढ केली जात नाही. परिणामी, कारखान्यांना जुन्याच किंवा मर्यादित दराने साखर विकावी लागते. निर्यातबंदीमुळे साखरेचे भाव आणखी दबावाखाली येऊन कारखान्यांची आर्थिक कोंडी होते. शेतकर्यांचे उसाचे पैसे वेळेवर देण्यात अडचणी येतात. निर्यात सुरू असती, तर कारखान्यांना तत्काळ रोख रक्कम उपलब्ध झाली असती आणि शेतकर्यांची देणी भागवणे सोपे झाले असते. यंदा अल निनोच्या प्रभावामुळे मान्सून सरासरीपेक्षा कमी पडण्याची शक्यता वर्तवली गेली आहे. काही जागतिक हवामानतज्ज्ञ सुपर अल निनो स्थिती निर्माण होऊन भारतात भीषण दुष्काळ पडण्याची भाकिते व्यक्त करत आहेत. ऊस हे अधिक पाणी लागणारे पीक आहे. पुरेसे पाणी न मिळाल्यास ऊस आणि पर्यायाने साखर उत्पादन घटण्याची भीती आहे. या संभाव्य धोक्यांचा वेध घेत केंद्राने निर्यातबंदीचे पाऊल उचलल्याचे दिसते.*

*चालू हंगामात महाराष्ट्राला मिळालेल्या एकूण ४ लाख ८८ हजार टन साखरेच्या निर्यात कोट्यापैकी सुमारे ३ लाख २५ हजार टन साखरेची निर्यात झाली आहे; परंतु निर्यातबंदीमुळे उर्वरित ३० ते ४० टक्के कोटा अधांतरी अडकला असून तो गोठवला गेला आहे. यामुळे साखर कारखान्यांची कोंडी झाली आहे. दुसरीकडे केंद्र सरकारने साखरेच्या एफआरपीमध्ये प्रतिटन शंभर रुपयांची वाढ केली. यंदा १०.२५ टक्के साखर उतार्याला प्रतिटन ३,६५० रुपये द्यावे लागणार असल्याने कारखानदारांच्या अडचणीत वाढ झाली आहे. फेब-ुवारी २०२६ पर्यंत ही थकबाकी आधीच १६,०८७ कोटी रुपयांवर पोहोचली असून ती मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल ३२ पटीने अधिक आहे. साखरेचे किमान विक्री मूल्य २०१८-१९ पासून 'जैसे थे' म्हणजेच प्रतिकिलो ३१ रुपये आहे. निर्यातबंदीचा निर्णय अमलात आणताना सरकारने विक्री मूल्य ३८ ते ४० रुपये करण्याची मागणी साखर उद्योगाकडून केली जात आहे. इथेनॉलनिर्मितीसाठी ऊस आणि साखर हे सर्वात मोठे आणि शाश्वत नैसर्गिक स्रोत आहेत.*

*पेट्रोलमध्ये २० टक्क्यांपर्यंत इथेनॉल मिश्रण करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी देशात साखरेचा पुरेसा साठा आवश्यक आहे. उसाचा रस किंवा मोलॅसेसपासून इथेनॉल तयार केले जाते, तेव्हा प्रत्यक्ष साखरेच्या एकूण उत्पादनावर त्याचा थेट परिणाम होतो. देशांतर्गत साखरेचा साठा सुरक्षित असेल, तरच कारखाने इथेनॉलनिर्मिती करू शकतात. उत्पादन घटले आणि शिल्लक साठा चिंताजनक पातळीवर आला, तर सरकारला अन्नसुरक्षेचा विचार करून इथेनॉलनिर्मितीवर मर्यादा आणाव्या लागतील. जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे भाव वधारत असताना इथेनॉलनिर्मिती बाधित होणे परवडणारे नाही. त्यामुळे साखर निर्यात थांबवून सरकारने ऊर्जा सुरक्षेला प्राधान्य दिले; पण ते देत असताना अडचणीतील साखर उद्योग टिकवण्यासाठी पूरक धोरणे राबवण्याची तत्परताही सरकारने दाखवायला हवी. मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नाबाबत गांभीर्य दाखवल्यास अनेकांना रोजगार देणारी आणि ग्रामीण अर्थकारणाचा कणा असणारी साखर कारखानदारी तग धरू शकेल.*

# चांदूररेल्वे पोलिसांनी पकडलेला १० टन गुटखा जावेदचा

## अटकेतील दुसऱ्या आरोपीने दिली कबुली, मुख्य आरोपी पसार

### प्रादेशिक पासपोर्ट कार्यालयाला पोलीस देणार जावेदची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ चंदूर रेल्वे**

चांदूररेल्वे पोलिसांनी १२ मे रोजी एका ट्रकमधून १० टन गुटखा व सुंगधी तंबाखू जप्त करून आरोपी शेख इमरान शेख मुस्कानला अटक केली होती. बुधवारी दुसरा आरोपी मोहम्मद सलीम शेख ईसाख (वय ३२, रा. पडसखेड) याला अटक

करून कस्टडीत घेतले. जप्त केलेला गुटखा अमरावतीच्या जावदेचा असल्याचे मोहम्मद सलीम याने पोलिसाना सांगितले. त्या आधारावर पोलिसांनी जावेदविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. जावेद हा देश सोडून पळू जाऊ नये म्हणून त्याची माहिती प्रादेशिक पासपोर्ट कार्यालयाला पोलीस देणार आहेत.अमरावती शहरातून मोठ्या प्रमाणात अवैध गुटख्याची वाहतूक होत असून अन्न व औषधी प्रशासन विभाग गाढ झोपेत आहे. गेल्या काही वर्षात त्यांच्या विभागामार्फत एकही मोठी कारवाई झालेली दिसत नाही. परंतु ग्रामीण व शहर पोलिसांनी अवैध गुटखा तस्करांवर वेळोवेळी कारवाई केल्याची नोंद आहे. तरी सुध्दा अमरावतीमधून विदर्भासह संपूर्ण राज्यात गुटखा पुरवठा केला जातो. परंतु जिल्ह्याचे नवे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी पदाची सुत्रे स्वीकारताच जिल्ह्यात धडक कारवाई सुरु केली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पोलीस यंत्रणा खळबळून जागी झाली आहे. दरम्यान १२ मे रोजी चांदूररेल्वे पोलिसांनी ट्रक क्र.एम




एच ०१ सीव्ही ४९६२ हा मालखेड गावालगत पकडला आणि ट्रकची पाहणी केली असता त्यात बाजीराव गुटखा आणि सुंगधी तंबाखुची १०५ पोती असा एकूण १० टन गुटखा किंमत १ कोटी १ लाख ३५ हजार रुपयांचा गुटखा व ट्रक जप्त केला. तसेच ट्रक चालक शेख इमरान शेख मुस्कानला अटक केली. परंतु ट्रकमधून तीन युवक पसार झाल्यामुळे पोलीस त्यांच्या शोधात होते. बुधवारी पोलिसांनी दुसरा आरोपी मोहम्मद सलीमला अटक् करून न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला एक दिवसाची कोठडी सुनावली होती. तेव्हा पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता जप्त केलेला गुटखा जावेदचा असल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. त्यामुळे पोलिसांनी जावेदला आरोपी केले आहे. ग्रामीण पोलिसांसह कारंजा पोलिसांनी ९ मे रोजी २ कोटी रुपयांचा गुटखा जप्त केला आणि चार दिवसांपूर्वीच सिन्नर पोलिसांनी १.८० कोटींचा गुटखा जप्त केला आहे. जप्त केलेला संपूर्ण गुटखा जावेदचा असल्याचे उघड होताच सिन्नर पोलीस मंगळवारी - जावेदच्या शोधात अमरावतीला आली होती. परंतु तो पसार असल्यामुळे पोलिसांना रिकाम्या हाताने परतावे लागले. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जावेद गुटख्याचा पुरवठा करीत असल्यामुळे तो विदेशात जाण्याची शक्यता पोलिसांना आहे. त्यामुळे पोलिसांकडून जावेदची संपूर्ण माहिती प्रादेशिक पासपोर्ट कार्यालयाला देण्यात येणार आहेत.जप्त केलेल्या गुटखा प्रकरणात पळसखेड येथील दुसऱ्या आरोपीला अटक करून त्याची कसून विचारपूस केली असता त्याने हा गुटखा जावेदचा असल्याचे सांगितले. त्यामुळे जावेदला आरोपी करण्यात आले आहे. तसेच त्याची माहिती प्रादेशिक पासपोर्ट कार्यालयाला देण्यात येईल, अशी माहिती चांदूररेल्वेचे ठाणेदार अजय आकरे यांनी दिली.

# पोलिसांच्या धाडसी मॉकड्रीलमध्ये अतिरेकी ठार, एक जेरबंद

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२३अमरावती**

अमरावती बसस्थानकातील एका एसटीबसमध्ये अतिरेक्यांनी काही प्रवाशांना बंदिस्त केल्याची माहिती मिळताच पोलिसांच्या दहशतवाद विरोधी जलद प्रतिसाद पथकातील अधिकारी व तत्काळ बसस्थानकातजाऊन एका अतिरेक्याचा खात्मा कर्मचाऱ्यांनी केला. तर दुसऱ्याला ताब्यात घेऊन पाचही प्रवाशांची सुरक्षित सुटका केली. यावेळी बसस्थानक परिसरात अचानक गोंधळ उडाला होता. पोलिसांचे हेमॉकड्रील असल्याचे माहिती पडताच नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला. आगामी सण-उत्सव, बकरी ईद तसेच व्हीव्हीआयपी सुरक्षा आणि कायदा व सुव्यस्थेच्या अनुषंगाने अमरावती मध्यवर्ती बस स्टॉप येथे शुक्रवारी सायंकाळी पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशाने दहशतवाद विरोधी जलद प्रतिसाद पथकाद्वारे मॉकड्रील घेण्यात आले होते. मॉकड्रील दरम्यान दोन शस्त्रधारी दहशतवाद्यांनी अमरावती बसबस्थानकातील उभ्या असलेल्या अमरावती-अकोला जाणाऱ्या बसमध्ये काही प्रवाशांना ओलिस करून ठेवले होते. अशा माहितीवर जलद प्रतिसाद पथकातील कमांडोंनी अत्यंत कुशलतेने आणि चपळाईने कारवाई करून कोणतीही मनुष्यहाणी होऊ न देता १ अतिरेकी ताब्यात घेतला व दुसऱ्याला जागीच ठार केले. तसेच ओलीस ठेवलेल्या पाच प्रवाशांची सुखरूप सुटका केली. याकारवाईत जलद प्रतिसाद पथकाचे अधिकारी व कमांडो, डॉग स्कॉड, बी.डी.डी.एस., पोलीस निरीक्षक सोनाली गुल्हाने, उपनिरीक्षक नरवने व स्टॉप, पोलीस निरीक्षक सीमा दाताळकर व स्टॉप, कोतवाली पोलीस स्टेशनचे ठाणेदार मनोहर कोटनाके, उपनिरीक्षक गिरपुंजे, सहायक पोलीस निरीक्षक कडू व पोलीस स्टॉप, आर.सी. पी पथक आणि अमरावती मध्यवर्ती बसस्थानकाच्या प्रबंधक सुजाता गुल्हाने आणि त्यांचा स्टॉप यांनी सहभाग घेतला होता.

# गोवंशीय जनावरांच्या चामडीची अवैध वाहतूक उघड

### बोलेरो पीकअपसह साडेपाच लाखांचा मुद्देमाल जप्त : दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३तिवसा** - येथील एसटी बसस्थानक परिसरात गोवंशीय जनावरांच्या चामडीची अवैध वाहतूक करणाऱ्या बोलेरो पीकअप वाहनासह पोलिसांनी एकूण साडेसहा लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

बोलेरो पीकअप वाहन क्रमांक एमएच २७ डीटी १७५० मध्ये मोठ्या प्रमाणात गोवंशीय जनावरांची चामडी घेऊन येत आहे, अशी माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी एसटी बसस्थानक परिसरात दि.२० मे रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजताच्या सुमारास तत्काळ नाकाबंदी करून संशयित वाहन अडविले. वाहनाची पाहणी



केली असता त्यामध्ये तब्बल २५० नग गोवंशीय जनावरांची चामडी आढळून आली. पोलिसांनी अंदाजे ५० हजार रुपये किंमतीची चामडी तसेच ५ लाख रुपये किंमतीचे बोलेरो वाहन असा एकूण ५ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी बोलेरो चालक अक्षय कार्तिक काळसरपे (वय २७, रा. इंदिरानगर, बडनेरा) तसेच वाहन मालक अरबाज राजू कुरेशी (रा. नवी वस्ती, बडनेरा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढीलतपास तिवसा पोलीस करीत आहेत. ही कारक तिवसाचे पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय यांच नेतृत्वात पोलीस जमादार पवन घरडे, अरविंद गावंडे भूषण चंडेल यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.-

# अमरावती-मधाचे गाव आमझरी-चिखलदरा 'राजमाता जिजाऊ' बस सेवा सुरु करा

## चिखलदरा स्फुर्ती क्लस्टर ची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ अमरावती**

विदर्भाचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिखलदरा या प्रसिद्ध पर्यटन स्थळासाठी अमरावतीवरून थेट बस सेवा सुरू करण्यात यावी, अशी आग्रही मागणी चिखलदरा स्फुर्ती क्लस्टरचे संचालक सुनील भालेराव यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. स्फुर्ती क्लस्टर शहापूर चिखलदरा (हनी अँड खवा मल्टी प्रॉडक्ट प्रोसेसिंग स्फूर्ती क्लस्टर) यांच्या वतीने देण्यात आलेल्या या निवेदनात, मागील पाच वर्षांपासून ही महत्त्वाची बस सेवा बंद असल्याने पर्यटक आणि स्थानिक आदिवासी नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. या संदर्भातील निवेदनाच्या प्रती महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या (चडठढउ) विभाग नियंत्रकांनाही योग्य त्या कारवाईसाठी पाठवण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, या प्रकरणी अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच स्थानिक खासदार बळवंत वानखेडे यांच्याकडेही साकडे घालण्यात आले असून, त्यांनी या मागणीचे गांभीर्य ओळखून स्वतंत्र पत्रव्यवहाराद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे ही बस सेवा सुरू करण्याची आग्रही शिफारस केली आहे.सध्या अमरावती महसूल विभागीय जिल्हा मुख्यालयातून चिखलदऱ्यासाठी थेट सरकारी बस उपलब्ध नसल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. सद्यस्थितीत यवतमाळवरून येणाऱ्या केवळ एकाच सायंकाळच्या ५ वाजताच्या बसवर पर्यटकांना आणि स्थानिक प्रवाशांना अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे चिखलदऱ्याला जाणाऱ्या पर्यटकांना खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो, जो अत्यंत खर्चिक ठरत आहे. या महागड्या प्रवासामुळे




चिखलदरा येथील पर्यटनाला मोठा फटका बसत असून पर्यटकांच्या संख्येत घट होत असल्याचे संचालक सुनील भालेराव व पदाधिकाऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे.पर्यटन व्यवसायाला चालना देण्यासाठी आणि सर्वसामान्य पर्यटकांना विदर्भाच्या नंदनवनाचा आनंद घेता यावा यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी यात तातडीने लक्ष घालण्याची विनंती करण्यात आली आहे. अमरावती ते चिखलदरा मार्गे मधाचे गाव आमझरी या मार्गावर दररोज किमान दोन इलेक्ट्रिक (ए-ईी) आणि एक साधी 'राजमाता जिजाऊ' बस सेवा त्वरित सुरू करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. यामुळे स्थानिक आदिवासी बांधवांना प्रवासाची सोय होईल आणि मधाचे गाव असलेल्या आमझरीसह परिसरातील स्थानिक व्यावसायिकांच्या व्यवसायात मोठी वाढ होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. या निवेदनावर संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गोपीलाल धिकार, नंदनवन शहर उपजिविका केंद्र चिखलदरा महिला बचतगटांच्या सदस्यांनी व पदाधिकाऱ्यांनी चिखलदरा स्फुर्ती क्लस्टर द्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे ही मागणी लावून धरली आहे. आता पालकमंत्री, खासदार आणि स्थानिक संघटनांच्या या संयुक्त पाठपुराव्यानंतर प्रशासन यावर काय पाऊल उचलते, याकडे संपूर्ण चिखलदरावासी व पावसाळी पर्यटकांचे लक्ष लागले आहे.

# पाण्याच्या शोधात आलेल्या हरणावर भटक्या कुत्र्यांचा हल्ला

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२३तिवसा** -

तालुक्यातील गुरुदेव नगर परिसरात आज सकाळी सुमारे सहा वाजताच्या दरम्यान वाढत्या उष्णतेमुळे व पाण्याच्या शोधार्थ जंगल परिसरातून बाहेर पडलेल्या एका हरणाच्या पिल्लावर भटक्या कुत्र्यांच्या कळपाने हल्ला करून त्याला गंभीर जखमी केले. ही घटना गुरुदेव नगर येथील पाण्याच्या टाकीमागील भागात घडली. पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे भटकंती करत असलेल्या हरणाच्या पिल्लाला कुत्र्यांच्या कळपाने घेरले व त्याच्यावर अचानक हल्ला चढविला. या दरम्यान कुत्र्यांनी पिल्लाच्या पाय व पोटाचे लचके तोडल्याने ते गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिक व प्राणीप्रेमींनी तात्काळ



घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी मोठ्या प्रयत्नांनी जखमी पिल्लाला कुत्र्यांच्या तावडीतून सुरक्षित बाहेर काढले. विशेष म्हणजे, उपस्थित नागरिक व प्राणी मित्रांनी तात्काळ तिवसा वन विभागाला सदर घटनेची माहिती दिली. मात्र, तब्बल दीड तास उलटूनही वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी न पोहोचल्याने अखेर प्राणी मित्रांनीच पुढाकार घेत जखमी हरणाच्या पिल्लाला सुरक्षितरित्या ताब्यात घेऊन तिवसा येथील वन विभाग कार्यालयात दाखल केले. सध्या वाढत्या उन्हामुळे जंगलातील जलस्रोत आटत चालले असून वन्यजीवांना पाण्याच्या शोधार्थ मानवी वस्तीकडे येण्याची वेळ येत आहे. परिणामी अशा दुर्दैवी घटना वारंवार घडत असून वन्यजीवांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

# ५७६ जागा अद्यापही रिक्त आरटीई अंतर्गत २०१० प्रवेश निश्चित

### प्रतिक्षा यादीतील प्रवेशाला २९ मे पर्यंत मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२३अमरावती**

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशासाठी - ऑनलाईन सोडत काढल्यानंतर २ हजार ६२६ जागेसाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. १० मे पर्यंत यादीतील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर १५ ते २३ मे दरम्यान प्रतीक्षा यादीतील बालकांना आपला प्रवेश निश्चित करायचा होता. त्यानुसार आजवर २ हजार १० विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश निश्चित केला आहे. त्यामुळे ५७६ जागा रिक्त असल्याने या फेरीला २९ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील आरटीई प्रवेशासाठी यावर्षी तब्बल७ हजार ९५३ बालकांचे अर्ज आले होते. यातून ज्यांना लॉटरी लागली त्यांनाच प्रवेश मिळत आहे. जिल्ह्यात गतवर्षी २२५ शाळा होत्या. यंदात्यामध्येवाढ करण्यात आली आहे. २२७ इंग्रजी शाळांमध्ये प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. २६२६ जागांसाठी अर्ज स्वीकारण्यात आले होते. प्रत्यक्षात २ हजार ५८६ पाल्यांचे प्रवेशाकरिता निवडनिवड करण्यात आली. पहिल्या फेरीतील प्रवेशानंतर आता दुसऱ्या फेरीमध्ये १५ मे पासूनप्रतीक्षा यादीतील बालकांना प्रवेश देण्यात येत आहे. शुक्रवारपर्यंत जिल्ह्यात २ हजार १० प्रवेश निश्चित झाले आहे. अजूनही ५७६ जागा रिक्त असल्याने या प्रवेशापासून कोणताही विद्यार्थी वंचित राहू नये याकरिता शासनाकडून प्रतिक्षा यादीतील प्रवेशाला २९ मे पर्यंत मुतदवाढ देण्यात आली आहे. ही शेवटची मुदतवाढ असून यानंतर मुदतवाढ दिली जाणार नाही, असे स्पष्ट करीत पालकांनी त्वरीत पाल्यांचे प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पावणेदोन लाख शेतकरी परताव्यासाठी अपात्र

## पिकविमा योजनेत जिल्ह्यातील ९ हजार ३४२ शेतकरी पात्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती–** पिकविमा योजनेतील वगळण्यात आलेल्या चार ट्रीगरचा फटका शेतकऱ्यांना बसला असून कंपन्यांचे मात्र चांगभले झाले आहे. पीक कापणी प्रयोगाद्वारे उत्पादकता व तंत्रज्ञान आधारीत असे प्रत्येकी पन्नास टक्क्यांचे निकष लावण्यात आल्याने शेतकऱ्याना नुकसानीपेक्षाही कमी विमा परतावा मिळाला आहे. जिल्ह्यासाठी केवळ दोन कोटी ३० लाख रूपयांचा परतावा मंजूर झाला असून कंपनीला ११.२४ कोटी रूपयांचा प्रिमियम मिळाला. एक रूपयांत पिक विमा योजना बंद करून गतवर्षापासून नविन विमा योजना लागू करण्यात आली आहे. या नवीन योजनेत चार महत्वाचे ट्रीगर बाद करण्यात येऊन केवळ पिक कापणी प्रयोग व सॅटेलाईट बेस तंत्रज्ञानावर आधारीत उत्पादकतेची सरासरी काढण्याचे निकष लागू करण्यात आले. या निकषावरच पिक विमा परतावा मिळाला आहे. त्यामुळे पिक विमा योजनेत सहभागी शेतकऱ्याना



नुकसान होऊनही परतावे मिळू शकले नाहीत व त्यांचे दुहेरी नुकसान झाले. गतवर्षीच्या खरीपात जिल्ह्यातील १ लाख ८५ हजार ५६० शेतकऱ्यांनी नवीन पीक विमा योजनेत सहभाग घेत ८.९० कोटी रूपये प्रिमियम जमा केला. राज्य शासनाने २.१२ कोटी व केंद्र शासनाने २.१२ कोटी प्रिमियम जमा केला आहे. जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी दोन कोटी ३० लाख रूपयांचा परतावा मंजूर करण्यात आला आहे. ९ हजार ३४२ शेतकऱ्यांना परतावे मिळाले. तर, योजनेतील सहभागी व प्रिमियम भरणाऱ्या एक लाख ७६ हजार २१८ शेतकऱ्यांना परतावे मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. गत हंगामातील पावसाळ्यात दहा तालुक्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस व ४२ मंडळातील अतिवृष्टीने पिकांचे मोठे नुकसान झाले. सरासरी उत्पादनात घट आली. मात्र तांत्रिक निकष लागू करण्यात आल्याने दहा तालुक्यातील शेतकऱ्याना परतावे नाकारण्यात आले. नवीन पिक विमा योजनेतील परताव्यांची स्थिती बघता ही योजना शेतकऱ्यांसाठी की कंपनीच्या भल्यासाठी हा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. त्यामुळे आगामी हंगामात या योजनेत सहभागी शेतकऱ्यांची संख्या घटण्याची शक्यता वाढली आहे.

**जिल्ह्यातील पिक विमा स्थिती–** सहभागी शेतकरी : १, ८५, ५६०, शेतकरी प्रिमियम : ८.९० कोटी, राज्य शासनाचे प्रिमियम : २.१२ कोटी केंद्र शासनाचा प्रिमियम : २.१२ कोटी परतावा मिळालेले शेतकरी : ९, ३४२ एकूण परतावा मिळाला : २.३० कोटी

# महसूल विभागाने जबाबदारी घेऊन कार्य करावे

## अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगेमहसूल विभागाच्या विविध कार्यालयांना भेटी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ अमरावती,**

महसूल विभाग हा समाजासाठी कार्य करणारा विभाग आहे. त्यामुळे विविध परिस्थितीमध्ये अनपेक्षित जबाबदाऱ्या या विभागावर येतात. मात्र जनतेसाठी कार्य करावयाचे असल्यामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जबाबदारी घेऊन कार्य करावे, असे आवाहन अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात आज श्री. खारगे यांनी महसूलच्या अधिकाऱ्यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली. यावेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंदा दानेज आदी अधिकारी उपस्थित होते. श्री. खारगे यांनी महसूलमधील अधिकाऱ्यांनी आठवड्यातून एक दिवस दौरा करावा. यामुळे प्रशासनावर पकड मजबूत करण्यास मदत होणार आहे. दौरा करताना विविध विकासकामांची तपासणी केल्यास तथ्य जाणून घेण्यास मदत मिळणार आहे. त्यासोबतच जनतेशी भेटावे. त्यांनी दिलेल्या निवेदनांवर सकारात्मक कारवाई करावी. निवेदनावर केलेली कारवाई कळवावी. यामुळे



नागरिकांच्या अडचणी लक्षात येतात. हे सर्व करीत असताना अधिनस्त कर्मचाऱ्यांशी संवाद साधून समस्याही जाणून घ्याव्यात. प्रशासनाने नागरिकांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करावा. नागरिकांच्या समस्या, तक्रारींचा निपटारा करण्यासाठी व्यवस्था निर्माण करावी. त्यांच्या तक्रारींचा मागोवा घ्यावा. शासनने ईज ऑफ डुइंग बिझनेसचे धोरण स्विकारले आहे. त्यानुसार १२ दुरूस्ती करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी जिल्ह्याची संक्षिप्त माहिती दिली. जिल्हा प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येणारे विविध उपक्रमांची माहिती त्यांनी यावेळी दिली. प्रामुख्याने जिल्ह्यात लोकसहभागातून निर्माण करण्यात येणाऱ्या पांदन रस्त्याची माहिती दिली. तसेच रहिवासी जमिन नियमानुकूल करणे, पट्टेवाटप करणे, मिळकत पत्रिका वाटप करणे याबाबत माहिती दिली. दरम्यान श्री. खारगे यांनी सकाळी अमरावती उपविभागीय अधिकारी कार्यालय, अमरावती तहसील कार्यालय, सहनिबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा अधीक्षक भूमिअभिलेख कार्यालय, वडाळी मंडळ अधिकारी कार्यालयाला भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली. यावेळी त्यांनी कार्यरत कर्मचारी यांच्याकडून कामकाजाची माहिती घेतली.

# सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल, अमरावती येथे वडिलांनी आपली किडनी देऊन वाचविले मुलाचे प्राण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ अमरावती** – स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय ( सुपर स्पेशलिटी) हॉस्पिटल अमरावती. येथे ७२ वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आली.सदर रुग्ण हा काही महिन्यांपासून किडनी आजाराने त्रस्त असल्याने त्यासाठी बाहेर उपचार पद्धती चालू होती व काही महिन्यांपासून डायलिसिस करत होता . तेव्हा डॉक्टरांनी रुग्णास व त्याच्या कुटुंबीयास किडनी प्रत्यारोपण विषयी माहिती दिली व विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय ,अमरावती येथे आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून होत असलेल्या यशस्वी व विनामूल्य शस्त्रक्रिया यासाठी रुग्ण विविध जिल्ह्यांमधून नव्हे तर इतर राज्यामधून सुद्धा येत असतात याविषयी महिती दिली. तेव्हा आज रुग्णालयात झालेले ७२ वे किडनी प्रत्यारोपण, हे २२ वर्षीय करण नक्कल बारंगे यांची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे. सदर रुग्ण हा रा. पिंपरी,ता मोर्शी, जि. अमरावती येथील रहिवासी असून मागील काही महिन्यांपासून डायलिसिस चालु होते. मात्र डायलिसिस यावर दीर्घकाळ उपाय नसून व होणारा त्रास बघुन किडनी प्रत्यारोपण हा यावरील योग्य उपाय आहे, असे जेव्हा डॉक्टरांनी सांगितले त्यावेळी मुलाच्या पुढील भविष्याचा विचार करून वडील नक्कल श्रीराम बारंगे (५१) यांनी आपली एक किडनी मुलगा करण ला देण्याचा निर्णय घेतला, व आपली एक किडनी करण ला देऊन त्याला नवीन जीवन दिले. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया विनामुल्य करण्यात आली.सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल अमरावती येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नेफरोलॉजिस्ट डॉ.





प्रणित काकडे, डॉ नयन काकडे ,युरो सर्जन डॉ.राहुल पोटोडे, डॉ.विक्रम देशमुख, डॉ. प्रतिक चिरडे ,डॉ राहूल घुले , बधिरिकरण तज्ञ- डॉ. रोहित हातगावकर, डॉ बालकृष्ण बागवाले , डॉ. दिपाली देशमुख , डॉ अश्विनी मढावी, डॉ रमणिका ढोमणे, डॉ शीतल सोळंकी, डॉ.विक्रांत कुळमेथे, डॉ.माधव ढोपरे,डॉ. जयश्री पुसदेकर, डॉ.नाहीद, डॉ. रमणीय,डॉ. उज्वल अभ्यंकर, डॉ. प्रियंका कांबळे, डॉ. श्रद्धा जाधव,समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) शितल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ.सोनाली चौधरी,महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने मधील एम.सी.ओ.डॉ. पायल रोकडे ,डॉ. दिव्यांनी मुंदाने, कल्याणी गाढवे त्याचप्रमाणे अधीसेविका चंदा खोडके यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर ज्योती तायडे, सरला राऊत, नीता कांडलकर, निलिमा मलवार, दिपाली तायवाडे, विवेक तायडे, वैष्णवी निकम, कीर्ती तायडे, अक्षय पवार, मयुरी खेरडे, ओम महल्ले ,अनु वडे,योगिश्री पडोळे,वैशाली ढोबळे, वैष्णवी टाकरखेडे ,कोमल भालेकर,रूपाली गवई , दीक्षा बेलखेडे, रेखा विश्वकर्मा, गोमकाळे, आहारतज्ञ कविता देशमुख, रश्मिता दिघडे, श्रीधर ढेंगे, औषध विभागामधील योगेश वाडेकर, अमोल वाडेकर, शुभम वरघडे , पंकज बेलुरकर, आशिष मिश्रा, सुनीता ठाकूर , अविनाश राठोड, तुषार नारायण , गजानन मातकर , रुपेश हरडे,शिवा भोंगाडे, दिपटे, भेंडकर, इंदू पाटील, गजानन चौधरी,प्रशांत थेटे, निलेश आत्राम इत्यादींचे किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेमध्ये विषेश सहकार्य होते.

# पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे नागरिक त्रस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी येथील दर्यापूर रोडवरील सारडा कॉलेज समोरील जयस्वाल पेट्रोल पंपावर सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास मोठी गर्दी झाल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला. पेट्रोल भरण्यासाठी




वाहनांच्या रांगा लागल्या असताना पंपावरील महिला कर्मचारी पैसे मोजण्यात व्यस्त असल्याचा प्रकार समोर आला.प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, गर्दीत लहान मुले तसेच काही रुग्ण देखील उपस्थित होते. मात्र, ग्राहकांची वाढती गर्दी आणि गैरसोय लक्षात न घेता संबंधित कर्मचारी तब्बल पंधरा ते वीस मिनिटे बाहेर न आल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले.वाहनधारकांना दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागल्याने अनेकांनी संताप व्यक्त केला. विशेषतः रुग्ण आणि ज्येष्ठ नागरिकांना याचा अधिक त्रास सहन करावा लागल्याचे सांगण्यात आले. संबंधित पेट्रोल पंप व्यवस्थापनाने ग्राहकांच्या सुविधेकडे लक्ष देऊन अशा प्रकारांची पुनरावृत्ती होणार नाही यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# ११ केव्हीच्या पोलवर करंट लागून २४ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३चांदूर रेल्वे–** शेतातील मंदिराच्या बांधकामासाठी पाणी सुरू व्हावे, या उद्देशाने विद्युत लाईन दुरुस्त करण्यासाठी ११ केव्हीच्या पोलवर चढलेल्या २४ वर्षीय युवकाचा करंट लागून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना सावंगी संगम परिसरात शुक्रवारी सायंकाळी घडली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे.





मृत युवकाचे नाव अंकुश श्रावणजी नेवारे (वय २४, रा. सावंगी संगम) असे आहे. अंकुश हा डीजे व्यवसायासोबतच विद्युत संबंधित छोटी–मोठी कामे करीत होता. त्याच्या कुटुंबाची हडपा शिवारात सुमारे दोन एकर शेती असून, शेतातील वीजपुरवठा बंद असल्याने तो लाईन सुरू करण्यासाठी प्रयत्न करीत होता. माहितीनुसार, शुक्रवारी सायंकाळी पाच ते साडेपाच वाजताच्या सुमारास अंकुश शेताजवळील ११ केव्ही विद्युत पोलवर चढून जंपर बदलण्याचे काम करीत होता. संबंधित लाईन दररोज सायंकाळी चार वाजता बंद होऊन सहा वाजता सुरू होते, असा त्याचा समज होता. मात्र अचानक विद्युत पुरवठा सुरू झाल्याने त्याला जोरदार करंट लागला आणि तो पोलवरच लटकलेल्या अवस्थेत मृत झाला.घटनेची माहिती मिळताच गावकरी घटनास्थळी धावले. ग्रामस्थांच्या मदतीने अंकुशला पोलवरून खाली उतरवण्यात आले. याबाबतची माहिती चांदूर रेल्वे पोलिसांना देण्यात आली. मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय, चांदूर रेल्वे येथे आणण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत. गावकऱ्यांच्या माहितीनुसार, अंकुशच्या शेतात मंदिर बांधकाम सुरू होते. बांधकामासाठी पाण्याची गरज असल्याने बंद पडलेली लाईन सुरू करण्याचा तो प्रयत्न करीत होता. मात्र नियतीने घात केला आणि एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला. अंकुशच्या पश्चात आई–वडील व भाऊ असा परिवार असून, या घटनेमुळे सावंगी संगम गावावर शोककळा पसरली आहे. मृतकाच्या कुटुंबाला शासनाकडून आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी गावकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# दोन वळूंची अर्धातास झुंज एकास गंभीर दुखापत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अचलपुर : –**

परतवाडा शहरातील नागरीकांना मोकाट जनावरांनी हैराण केले आहे . मोकाट वळू , गाई , भटके श्वान , डुक्कर आदी नी आछाद मांडला आहे .अशातच बुधवार रोजी शहरातील अत्यंत वर्दळीच्या दुरानी चौक परिसरात दोन वळू आपसात भिडले . त्यात अनेक उभ्या असलेल्या दुचाकी नुकसान झाले तर एक वळू गंभीर जखमी झाला स्थानिक लोकांच्या साहाय्याने वळूची झुंज सोडण्यात आली . परतवाडा अचलपर शहरात मोकाट जनावरांनी हैदोस मांडला आहे दररोज होत असलेल्या मोकाट जनावरांचा त्रासामुळे नागरिक त्रासुन गेले आहे . बुधवारी सायंकाळ च्या दरम्यान परतवाडा शहरातील दुराणी चौकात दोन वळू आपसात भिडले . दोघांची झुंज सोडवण्याचा स्थानिक व्यावसाईक , नागरी कांनी प्रयत्न केले तरी ही कोणी वळू हार माणायला तयार नव्हते कधी काळा तर कधी पांढरा रंगाचा वळू एक दुसऱ्यावर हावी



### परतवाडा शहरात नागरीक वेटीस नगरपालीकेने बंदोबस्त करण्याची मागणी

होत गेले दोघांच्या लढाईत एक पाणटपरी , मॅकेनिकल ची टपरी चे तसेच दोन तिन उभ्या असलेल्या दुचाकींचे नुकसान झाले अशात एक वळूने दुसऱ्या वळूला कॉंक्रीट मिक्स कराच्या मिक्सवर वर फरकट नेऊन शिंगाने उचलून जमीनीवर पटकले यात दुसरा वळू जागेवर बेशुद्ध होऊन पडला तरीही तो सोडत नसल्याने अनेक नागरीक धाऊन गेले पाण्याचा काडी बांबु चे वार करत दुसऱ्या वळूला हाकलून लावले .

दुसरा वळू १० मी बेशुद्ध होता अनेकांना वाटले की वळू गेला परंतु डोक्यावर , अंगावर पाणी टाकल्याने तो शुद्धीवर आला मात्र गंभीर दुखापत झाली होती नागरीकांच्या तत्परतेने त्या वळूचे प्राण वाचले गेले . दररोज परतवाडा अचलपर शहरात कुठे ना कुठे मोकाट जनावरे भांडत असतात अनेकदा नागरीक जखमी तसेच वाहनांचे नुकसान देखील करतात . नागरीकांना वेठीस धरणा ऱ्या अशा वळूंचा तसेच मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरीक करत आहे


# पंचवटी उड्डाणपुलावर सुरक्षेसाठी जाळी

## वाहतूक पोलिसांचे बांधकाम विभागाला पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती–**

गाडगेनगर ते शिवाजी नगरकडे जाणाऱ्या उड्डाण पुलावरून दोघे बुलेटस्वार खाली कोसळून गंभीर जखमी झाल्याने त्याठिकाणी आता सुरक्षेसाठी जाळी लावण्याच्या हालचाली पोलिसांनी सुरू केल्या आहेत. दोन दिवसांपूर्वी अनियंत्रित दुचाकी ही दुभाजकावर धडकून उड्डाणपुलाच्या सुरक्षा भिंतीवर धडकली. त्यावेळी बुलेटवर असलेल्या दोघे पुलाखाली कोसळून गंभीर जखमी झाले. त्यात अक्षय भागवत धाकडे (वय २९) व कार्तिक प्रदीप छापानी (वय २४) या दोघांचा समावेश आहे. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने काही उपाययोजना करता येतील काय याचा विचार पोलिसांनी सुरु केला होता. दरम्यान, सुरक्षाजाळी बसविण्या संदर्भात वाहतूक पोलिस विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र पाठविले आहे. अशी माहिती पोलिस उपायुक्त रमेश धुमाळ यांनी दिली. विशेष



म्हणजे तत्कालीन पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांच्या कार्यकाळात राजकमल ते इर्वीन उड्डाणपुलावर एकाच ठिकाणी अपघाताच्या बऱ्याच घटना घडल्या होत्या. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने सुरक्षा जाळी बसविली होती. ती अद्यापही कायम आहे. शिवाय या उड्डाणपुलावर गतिरोधकही लावले होते. तेव्हापासून अपघात कमी झाले. तशाच उपाययोजना आता पंचवटी चौकातील उड्डाणपुलावर करण्यात येतील असे पोलिसांनी सांगितले.

दुचाकीवरून प्रवास करताना वेगावर नियंत्रण ठेवावेच लागेल. शिवाय स्वत:च्या सुरक्षेसाठी हेल्मेटचा वापर करावा. त्यादृष्टीने वाहतूक पोलिसांनी जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. – **रमेश धुमाळ,** पोलिस उपायुक्त.

# तपोवनला शासनाकडून निधीची प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती**

कुष्ठरुग्णांच्या पुरर्वसनासाठी गेल्या ८० वर्षांपासून अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या विदर्भ महारोगी सेवा मंडळाला (तपोवन) शासनाच्या निधीची प्रतीक्षा आहे. ८० वर्षे झालेल्या या संस्थेच्या इमारती, दवाखाने जीर्ण झाले असून येथील रुग्णांच्या पुनर्वसनासाठी १० कोटी रुपये देण्याचे आश्वासन शासनाने दिले होते, परंतु ते अद्याप पूर्ण झाले नसल्याने आहे त्या स्थितीत येथील कार्य सुरु ठेवण्याची वेळ आली आहे. श्रद्धेय बाबा आमटे यांच्या आनंदवनातील कुष्ठरुग्णांच्या पुनर्वसनासाठी महाराष्ट्र शासनाने विशेष बाब म्हणून १० कोटी रुपयाचा कॉपर्स फंड देण्यास मान्यता दिली. त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या मंत्रिमंडळाचे तपोवनचे अध्यक्ष डॉ. सुभाष गवई यांनी जाहीर आभार व्यक्त केले आहेत. तपोवन ही भारतातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी संस्था असून तिची स्थापना १९४६ ला झाली आहे. ८० वर्षे झालेल्या



या संस्थेच्या इमारती, दवाखाने जीर्ण झाले असून येथील रुग्णांच्या पुनर्वसनासाठी सुद्धा १० कोटी रुपये देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली होती. त्याला आरोग्य मंत्री डॉ. आबीटकर यांनी सकारात्मक

पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या तपोवनमधील कुष्ठरुग्नांच्या पुनर्वसनासाठी विधानसभेमध्ये आरोग्यमंत्री प्रकाशजी आबीटकर यांनी आमदार सुलभाताई खोडके यांना आश्वासन दिले होते. त्यानुसार १० कोटी रुपयांचा विशेष निधी तपोवनला तात्काळ द्यावा, अशी आमची विनंती आहे.

– **डॉ. सुभाष गवई** अध्यक्ष, तपोवन.

प्रतिसाद दिला होता. तपोवन संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष गवई व आमदार सुलभाताई खोडके यांच्या सोबत मुंबईला बैठक बोलावून अकरा मागण्यांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. त्यानंतर कार्यवाहीचे आश्वासन दिले होते. त्यानंतर विधानसभेच्या आश्वासन समितीने तपोवनच्या समस्यांचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार अमरावती सहाय्यक संचालक (कुष्ठरोग ) यांनी २ डिसेंबर २०२५ रोजी संस्थेला प्रत्यक्ष भेट देवून संपुर्ण संस्थेची पाहणी करून

### कुष्ठरुग्णांच्या पुनर्वसनात अडचणींची मालिका

असलेल्या अडचणी, जीर्ण असलेल्या वास्तू, रस्ते यांचा फोटोसह अहवाल शासनाला पाठविला होता. हा सर्व प्रवास होवून आता एक वर्षे होवून गेल्यानंतर देखील अद्यापही कुठलेही विशेष अनुदान तपोवनला प्राप्त झालेले नाही. त्यामुळे शासनाने आश्वासित केल्याप्रमाणे १० कोटी रुपये कुष्ठरुग्णांच्या पुनर्वसनासाठी कधी मिळणार, याची प्रतीक्षा आहे.

## निवडणुकीची मतदारयादी प्रसिद्ध

# विधान परिषद निवडणूक शहरात सर्वाधिक मतदार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती** विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघासाठी येत्या १८ जूनला सात केंद्रांवर मतदान होणार आहे. उपविभागीय अधिकारी स्तरावर मतदान प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सर्वाधिक मतदार संख्या अमरावती महापालिका क्षेत्रात ९५ इतकी असून धारणी उपविभागीय अधिकारी स्तरावर सर्वात कमी ४३ मतदार मतदान करतील. जिल्ह्यात सात उपविभागीय स्तर मतदानासाठी निश्चित करण्यात आले आहेत. या निवडणुकीत जिल्हा परिषद व पंचायत समिती अस्तीत्वात नसल्याने या दोन्ही स्वराज्य संस्थांचे मतदार नाहीत. त्यामुळे नगरपालिका, नगरपंचायत व महापालिकेचे एकूण ४५३ मतदार मतदानासाठी पात्र आहेत.




या मतदारांमध्ये २२६ महिला व २२७ पुरूष मतदारांचा समावेश आहे. या सर्वांना उपविभागीय अधिकारी स्तरावर तयार करण्यात आलेल्या मतदान केंद्रांवर मतदान करायचे आहे. अमरावती शहरातील मतदार प्रामुख्याने महापालिकेचे सदस्य असून त्यांना अमरावती उपविभागात मतदान करायचे आहे. महापालिकेतील ९५ सदस्य त्यासाठी पात्र आहेत. तर, धारणी नगरपंचायत व चिखलदरा नगरपरिषदे या दोन स्वराज्य संस्थांचे ४३ मतदार धारणी येथे मतदान करणार आहेत. अचलपूर उपविभागात चांदूर बाजार व अचलपुर, मोर्शी उविभागात मोर्शी, वरूड व शेंदुरजनाघाट या नगरपालिकेचे ८१, दर्यापूर उपविभागात अजंनगावसुर्जी व दर्यापूर या नगरपालिकांचे ६१, चांदूररेल्वे उपविभागातील धामणगाव रेल्वे व चांदूररेल्वे नगरपालिका तसेच नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीचे ६६ मतदार मतदानाचा हक्क बजावतील. तिवसा व भातकुली येथे ३८ मतदार आहेत.प्रत्येक केंद्रावर सहा पोलिसांसह ४२ कर्मचारी सात उपविभागीय अधिकारी आणि १४ तहसीलदार यांच्या नियंत्रणाखाली सात मतदान केंद्रांवर निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. प्रत्येक केंद्रावर सहा पोलिस कर्मचाऱ्यांसह एकूण ४२ कर्मचारी नियुक्त करण्यात येणार असून प्रत्येक मतदान केंद्रासाठी स्वतंत्र वाहनही सज्ज ठेवण्यात येणार आहे.

# मेळघाटातील चौराकुंड वनपरिक्षेत्रात विषारी पाण्यामुळे चार रानगव्यांचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३मेळघाट**

मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत धारणी तालुक्यातील चौराकुंड वनपरिक्षेत्रात चार रानगवे आणि एक भेकड विषारी पाणी प्यायल्यानं दगावल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

विषारी पाण्यामुळे प्राण्यांचा मृत्यू : चौराकुंड वनपरिक्षेत्रातील उत्तर अंजन झडप आणि चौराकुंड उत्तर खंड परिसरात जंगलगस्ती दरम्यान वन कर्मचाऱ्यांना प्रत्येकी तीन आणि एक असे एकूण चार रानगवे मृतावस्थेत आढळून आले. याच भागात एक भेकडही मृत अवस्थेत सापडला. रानगव्यांचा अचानक मृत्यू झाल्याची माहिती मिळताच चौराकुंड वनपरिक्षेत्र अधिकारी रवींद्र खेरडे यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना याबाबत माहिती दिली. प्राथमिक माहितीनुसार, विषारी पाणी प्यायल्यानं या प्राण्यांचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

या घटनेनंबाबत शुक्रवारी दुपारी वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची चमू तसेच मेळघाटात कार्यरत काही स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी घटनास्थळी दाखल झाले. रात्री उशिरा चार रानगव्यांसह एका भेकडाचे शवविच्छेदन करण्यात आलं असून, प्राथमिक तपासात विषारी पाणी पिल्यामुळेच या प्राण्यांचा मृत्यू झाल्याचं सांगण्यात आलं आहे.



उन्हाळ्यामुळे सध्या जंगलातील नैसर्गिक जलस्रोत कोरडे पडले आहेत. त्यामुळे वनविभागाकडून जंगलात कृत्रिम पाणवठ्यांच्या माध्यमातून वन्यप्राण्यांसाठी पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. दरम्यान, उत्तर अंजन झडप आणि चौराकुंड उत्तर खंड परिसरात घडलेल्या या घटनेनंतर संबंधित पाणवठ्यांचे नमुने तसेच मृत प्राण्यांच्या शरीरातील अवयव फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत, अशी माहिती चौराकुंड वनपरिक्षेत्र अधिकारी रवींद्र खेर्डे यांनी दिली.

ही घटना अतिशय दुर्दैवी असल्याचे सांगत वनविभागाने याप्रकरणाची सखोल चौकशी सुरू केली आहे. जंगलात शुक्रवार रात्रीपासून गस्त वाढवण्यात आली असून आजही वनकर्मचाऱ्यांकडून सतत निरीक्षण सुरू आहे. तसेच परिसरातील इतर पाणवठ्यांचेही पाणी तपासलं जात आहे. वन्यप्राण्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जात असून या घटनेचा संपूर्ण तपास केला जाईल, असं वनपरिक्षेत्र अधिकारी रवींद्र खेरडे यांनी स्पष्ट केलं.

# पतिदेवांचा ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात हस्तक्षेप, ग्रामस्थ वैंतागले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३पथ्रोट-** महिलांना राजकारणात संधी मिळावी म्हणून शासनाने ग्रामपंचायतींमध्ये ५० टक्के आरक्षण दिले असले, तरी अनेक ठिकाणी निवडून आलेल्या काही महिला सदस्यांच्या जागी त्यांच्या पतींचाच कारभार सुरू असल्याची कुजबूज आहे. आता ग्रामपंचायतींमध्ये प्रशासकीय काळ सुरू असतानाही अनेक ठिकाणी पतीदेवच कामकाजात हस्तक्षेप करीत असल्याची चर्चा गावखेड्यात आहे. अचलपूर तालुक्यासह जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये काही महिला सदस्यांना केवळ सभांपुरते मर्यादित ठेवल्या जात असल्याचे बोलल्या जात आहे. विकासकामांपासून कार्यालयीन निर्णयांपर्यंत सर्व व्यवहार त्यांच्या पतींकडूनच हाताळले जात असल्याने काही महिला लोकप्रतिनिधींना प्रत्यक्ष



काम करण्याची संधी मिळत नसल्याची ओरड आहे. दरम्यान, शासनाने याबाबत परिपत्रक काढून पदाधिकाऱ्यांच्या नातेवाइकांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात हस्तक्षेप करू नये, तसेच कार्यालयात बसू नये, असे स्पष्ट आदेश दिले आहेत. आदेशांचे उल्लंघन झाल्यास संबंधित पदाधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची तरतूदही करण्यात आली आहे. मात्र, स्थानिक स्तरावर या आदेशांकडे दुर्लक्ष होत असल्याने पतीदेवांचा हस्तक्षेप कायम असल्याचे चित्र आहे.

> महिला प्रशासक सदस्यांऐवजी त्यांच्या पतीदेवांना शासकीय कामात हस्तक्षेप करता येत नाही. जर त्यांचे पतीदेव शासकीय कामात हस्तक्षेप करीत असतील व तशाप्रकारची आमच्या कार्यालयात तक्रार आली तर आमच्याकडून शासनाच्या जीआरमध्ये असलेल्या तरतुदीनुसार निश्चितच कारवाई करण्यात येईल.
>
> **–विनोद खेडकर,** प्रभारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अचलपूर.

# तळेगाव ठाकूर येथे भुईमुंग काढणीला सुरुवात

## वाढत्या खर्चामुळे लागवड मध्ये घट..

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३तळेगाव ठाकूर :** परिसरात भुईमुग काढणीच्या कामाला सध्या वेग आला असून शेतशिवारात पहाटेपासून संध्याकाळपर्यंत काढणीचे काम सुरू आहे. भुईमूग पिकाला पेरणीपासून काढणीपर्यंत साधारण चार महिन्यांचा कालावधी लागतो. यंदा मौजा विंचोरी येथील शेतकरी दादाराव घोरमाडे यांनी उमेश उमप यांच्या शेतात भुईमूगाची लागवड केली होती.

या पिकासाठी बियाण्यावर सुमारे १८ हजार रुपये खर्च आला. त्यानंतर फवारणीसाठी ५ हजार, खतांसाठी ६ हजार, काढणीसाठी २० हजार असा खर्च झाला. तसेच शेत तयार करण्याचा व इतर पूरक खर्चही मोठ्या प्रमाणात झाला. एकूण उत्पादनाचा हिशोब करता ५ बॅग बियाण्यातून सुमारे ८ क्विंटल उत्पन्न मिळत असून बाजारात भुईमूगाला सध्या अंदाजे ७ हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळत आहे.

पूर्वी तळेगाव ठाकूर परिसरात मोठ्या प्रमाणात भुईमूग लागवड



केली जात होती. मात्र वाढता खर्च, मजुरांची टंचाई, वन्य प्राण्यांकडून होणारे नुकसान आणि बाजारभावातील अनिश्चितता यामुळे या पिकाची लागवड हळूहळू कमी होत चालली आहे.दरम्यान, काढणीच्या काळात मजूर वर्गाला मोठ्या कष्टाला सामोरे जावे लागते. पहाटेपासून ते संध्याकाळपर्यंत ४५ ते ४६ अंश सेल्सिअस तापमानात भुईमूग उपटणे व शेंगा तोडण्याचे काम करावे लागते. अनेक वेळा मजुरांसोबत त्यांच्या कुटुंबातील महिला व लहान मुलेही या कामात सहभागी होताना दिसतात.

**शेतकऱ्याची प्रतिक्रिया**

भुईमूग पिकात खर्च खूप वाढला आहे, पण त्यानुसार बाजारभाव मिळत नाही. मजूर मिळणे अवघड झाले आहे आणि वन्य प्राण्यांमुळेही नुकसान होते. एवढ्या कष्टानंतरही हातात फारसा नफा राहत नाही. त्यामुळे अनेक शेतकरी भुईमूग लागवडीपासून दूर जात आहेत, अशी प्रतिक्रिया तळेगाव ठाकूर येथील शेतकरी दादाराव घोरमाडे यांनी व्यक्त केली.

# देवस्थान इनाम निर्मूलन मसुद्यावर राज्यभर एल्गार

## अमरावतीत ४० पेक्षा अधिक निवेदनांचा भडिमार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ मुंबई/अमरावती**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने प्रस्तावित केलेल्या 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६' विरोधात राज्यभरातील मंदिर विश्वस्त, हिंदू संघटना आणि भाविक आक्रमक झाले आहेत. हिंदू देवस्थानांच्या जमिनी हिरावून घेणारा आणि मंदिरांचे



अस्तित्व धोक्यात आणणारा हा कायदा तात्काळ मागे घ्यावा, या मागणीसाठी राज्यभरात आंदोलनाची ठिणगी पडली असून, मुख्यमंत्र्यांपासून तहसीलदारांपर्यंत तब्बल ३०० हून अधिक निवेदने सादर करण्यात आली आहेत. अमरावती जिल्ह्यातही ४० हून अधिक निवेदने प्रशासनाला देण्यात आली.महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या नेतृत्वाखाली अष्टविनायक मंदिरांसह राज्यातील प्रमुख देवस्थानांचे १ हजारांहून अधिक विश्वस्त आणि प्रतिनिधींनी या मसुद्याविरोधात जोरदार भूमिका घेतली आहे. येत्या पावसाळी अधिवेशनात हा कायदा मंजूर करण्याची तयारी सुरू असल्याने मंदिर प्रतिनिधींमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, छत्रपती शिवाजी महाराज तसेच विविध ऐतिहासिक राजघराण्यांनी मंदिरांच्या नैवेद्य, अन्नछत्र आणि धार्मिक उत्सवांसाठी मोठ्या प्रमाणात जमिनी इनाम स्वरूपात दान दिल्या होत्या.

प्रस्तावित कायद्यातील कलम ३ आणि ४ मुळे या जमिनींची इनामे रद्द होऊन त्या खासगी व्यक्तींच्या ताब्यात जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. तसेच १ जानेवारी २०११ पूर्वीच्या अतिक्रमणधारकांना मालकी हक्क देण्याची तरतूद ही देवस्थान संपत्तीची कायदेशीर लूट असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.या मसुद्यात वक्फ बोर्डाच्या जमिनींना वगळण्यात आल्याने धार्मिक भेदभाव होत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. महसूल अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरोधात दिवाणी न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार मर्यादित करणारे कलम १८ देखील लोकशाहीविरोधी असल्याचे मंदिर प्रतिनिधींनी म्हटले आहे.

# खासगी शाळांतील शिक्षकांना जनगणनेची सक्ती करत येणार नाही

## ; हायकोर्टाचा सरकारला दणका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३मुंबई** खासगी शाळांतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जनगणनेच्या कामासाठी सक्ती करता येणार नाही, असे अंतरिम आदेश देत मुंबई उच्च न्यायालयानं केंद्र आणि राज्य सरकारला चांगलीच चपराक दिली आहे. न्यायमूर्ती गौतम अंखड आणि संदेश पाटील यांच्या सुट्टीकालीन खंडपीठानं शुक्रवारी (२२ मे) हे अंतरिम आदेश दिले. या आदेशाची प्रत रात्री उशिरा न्यायालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध झाली. तसेच, जनगणनेच्या कामावर हजर न राहणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांविरोधात कोणतीही फौजदारी किंवा अन्य कारवाई करू नये, तसेच त्यांना कारवाईसंदर्भात कोणतीही नोटीसही बजावू नये, असे स्पष्ट निर्देशही उच्च न्यायालयानं आपल्या आदेशात दिले आहेत.



हायकोर्टाचा निकाल काय? : खासगी शाळांतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जनगणनेचं काम देण्याबाबत सध्या सविस्तर सुनावणी घेणं शक्य नसल्याचं मुंबई उच्च न्यायालयानं स्पष्ट केलं आहे. सध्या न्यायालयाचं सुट्टीकालीन कामकाज सुरू असल्यानं या प्रकरणाची पुढील सुनावणी ३१ जुलै रोजी नियमित खंडपीठासमोर होणार असल्याचं न्यायालयानं नमूद केलं. उच्च न्यायालयानं आपल्या अंतरिम आदेशात म्हटलं आहे की, खासगी विनाअनुदानित शाळांतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जनगणनेचं काम देण्याचा अधिकार राज्य सरकारला नाही. केवळ सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडूनच जनगणनेचं काम करून घेतलं जाऊ शकते, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं.

# शेतातील गोठ्याला भीषण आग ५ बकऱ्या, १० कोंबड्या ठार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३तिवसा** तिवसा शहरालगत असलेल्या आनंदवाडी परिसरात शुक्रवारी पहाटे लागलेल्या भीषण आगीत शेतकर्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. आनंदवाडी जिनिंगला लागून असलेल्या मिथुन देशमुख यांच्या शेतातील गोठ्याला अचानक लागलेल्या आगीत पाच बकर्या व दहा कोंबड्या जळून मृत्यूमुखी पडल्या, तर शेतीसाठी वापरण्यात येणारे महत्त्वाचे साहित्य, स्प्रिंकलर संच व टिनपत्रे पूर्णतः जळून खाक झाले. या आगीत अंदाजे एक लाख रुपयांपेक्षा अधिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २२ मे २०२६ रोजी पहाटे सुमारे ४:३० वाजताच्या सुमारास मिथुन देशमुख यांच्या शेतातील कोठ्याला अचानक आग लागली. पहाटेच्या सुमारास लागलेल्या या आगीने काही



क्षणांतच रौद्ररूप धारण केले. आगीच्या ज्वाळांनी संपूर्ण गोठा वेढल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या भीषण आगीत गोठ्यात बांधलेल्या पाच बकर्या व दहा कोंबड्या जळून मृत्यूमुखी पडल्या. तसेच दोन स्प्रिंकलर संच, सुमारे पस्तीस टिनपत्रे, शेतीसाठी लागणारे साहित्य, चारा व अन्य वस्तू जळून खाक झाल्या. बचावकार्य दरम्यान एक गाय व एक वासरू सुखरूप बाहेर काढण्यात यश आले.

# कोरोनानंतर प्रथमच हिंदू स्मशानभूमीवर ओटे हाऊसफुल्ल

## शुक्रवारी हिंदू स्मशानभूमीवर तब्बल २५ अंत्यसंस्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती–** हवामान विभागाकडून पुढील तीन दिवसअकोला, अमरावती आणि वर्धा या तीन जिल्ह्यांना उष्णतेचा 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला आहे. विदर्भात उष्णतेचा हाहा:कार असून अमरावती शहरात गेल्या दोन दिवसांपासून सूर्य आग ओकत असल्याने घरात थांबलेला जीव असह्य गरमीने कासावीस झाला आहे. त्यामुळे गेल्या २४ तासात शहरात विविध कारणामुळेतब्बल २५ जणांनी जीव सोडत जगाचा निरोप घेतला आहे. या सर्व मृतदेहावर हिंदू स्मशानभूमीवर अंत्यसंस्कार करण्यात आले. हिंदू स्मशानभूमीवर साधारणतः दररोज ८ ते १३ डिग अंत्यसंस्कार होतात. मात्र गेल्या दोन दिवसा यामध्ये वाढ झाली असून शुक्रवारला ५४ ते ९५ वयोगटातील सुमारे २५ मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले.देशासह संपूर्ण महाराष्ट्र सध्या उन्हाच्या तीव्र झळांनी अक्षरशः होरपळून निघत आहे. राज्यातील अनेक बहरांमध्ये तापमानाने ४५ अंशांचा टप्पा ओलांडला असून, अमरावतीसह विदर्भातील परिस्थिती अधिकच चिंताजनक बनली आहे.

हवामान याच पार्श्वभूमीवर विभागाकडून पुढील तीन दिवस अमरावती, अकोला, आणि वर्धा या तीन जिल्ह्यांना उष्णतेचा 'रेड अलर्ट' – जारी करण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून अमरावतीमध्ये तापमान सातत्याने ४६ अंश सेल्सिअसच्या वर नोंदवले जात आहे. त्यामुळे तापत्या उन्हाच्या झाका, असह्य चटके सहन करता करता जीव घामाघुम झाला आहे.

घरातील एसी, कुलर फेल, वृद्ध, रुग्णांचे बेहाल सिमेंटचे



रस्ते, उंच इमारती, टिनशेडची घरे आणि डांबरी रस्ते दिवसभर उष्णता शोषून घेतात आणि रात्रीही तीवातावरणात सोडतात. त्यामुळे रात्र झाली तरी उष्णता कायम राहते. दिवसभर सूर्य आग ओकत असल्याने तापमान ४६ अंशाच्या वर गेल्यामुळे घरात लपलेला जीव सुद्धा घामाघुम झाला आहे. यात कडक उष्णतेमुळे घराघरातील फॅन सुद्धा गरम हवा फेकू लागले असून एसी व कुलर सुद्धा फेल झाले आहे.

> **दररोज ८ ते १३ मृत्यू**
>
> शहरातील लोकसंख्या पाहता हिंदू स्मशानभूमीवर दररोज सरासरी किमान ८ ते १३ मृतदेहाचे अंत्यसंस्कार केले जातात. मात्र गेल्या तीन–चार दिवसांपासून उष्णतेचे प्रमाण वाढल्यामुळे शहरात वयोवृद्धांचाजीवकासावीस झाल्याने मृत्यूचे प्रमाण वाढले असून शुक्रवारला ही संख्या २५ वर पोहोचली आहे.

त्यामुळे प्रत्येकाच्या घरातील लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्वांना जीव एका जाग्यावर थांबणे कठीण झाले आहे. विशेष म्हणजे आबालवृद्ध आणि वयोवृद्धांचे बेहाल झाले असून दिवसभरात शुक्रवारला शहरातील २५ जणांनी या जगाचा निरोप घेतला.हिंदू स्मशान भूमीचे व्यवस्थापक इंगळे यांनी दिलेल्या माहितीनुसार गेल्या दोन दिवसांपासून अंत्यसंस्काराचे प्रमाण वाढले आहे. शुक्रवारला सर्व ओटे फुल्ल झाले असून रात्री उशिरापर्यंत साधारणतः २५ जणांवर अंत्यसंस्कार करण्यात आले, अशी त्यांनी दिली.

### पुढील ३ दिवस धोक्याचे

उन्हाची तीव्रता वाढली असून उन्हाचा कडाका दिवसेंदिवस वाढत आहे. दुपारच्या वेळी ऊन अधिक तीव्र जाणवत आहे. ग्रामीण भागातही उन्हाचा तडाखा वाढला आहे. उन्हामुळे नागरिकांना त्रास होत आहे. दुपारच्या वेळेस बाहेर जाणे कठीण झाले आहे. कडाक्याच्या उन्हामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम झाल्याने आजारी रुग्णांचे प्रमाण वाढत असून वयोवृद्ध व रुग्णांचे बेहाल होत आहे. तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत असून सर्वांना काळचे घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. अमरावती जिल्ह्यात सलग तीन चा दिवस तापमानाचापारा ४५–४६ अंशापर्यंत राहणार असून उष्णतेचारेड अलर्ट कायम असणार आहे. २६ मे नंतरच अमरावतीकरांना उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळणार असल्याची माहिती मिळत आहे.–